## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 08/03/2020 (रविवार)
## (सकाळ)

---

### नागपूर (ग्रामीण), पोलीसांची अवैधरीत्या दारु विक्री व गाळण करणाऱ्यांविरूद्ध धडक कारवाई

संपुर्ण नागपूर (ग्रामीण) जिल्हयातील पोलीस स्टेशन निहाय अवैधरीत्या दारु विक्री व वाहतुकीबाबत दिनांक 07/03/2020 रोजी पोलीस स्टेशन मौदा, खापरखेडा, बोरी, एमआयडीसी बोरी, बेला, जलालखेडा, नरखेड, कळमेश्वर, खापा, उमरेड, भिवापूर, रामटेक मध्ये एकुण 38 केसेस अवैधरीत्या दारुची विक्री करणाऱ्या गुन्हेगांराविरुध्द दाखल करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये एकुण किंमती 8,93,480/– रुपयाचा माल जप्त करुन देशी दारू, विदेशी दारू, मोहाफुल दारु तसेच 4 मोटरसायकल कार्यवाही दरम्यान जप्त करण्यात आलेली आहेत.

याकरीता नागपूर (ग्रामीण) पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांनी अवैधरीत्या दारुची विक्री व वाहतुक करणाऱ्यांविरुध्द कार्यवाही करण्याहेतू प्रत्येक पोलीस स्टेशन अंतर्गत सतर्कपणे पेट्रोलींग व नाकाबंदी करुन कडक कार्यवाही करण्याबाबत सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व ठाणेदारांना यांना आदेश दिले आह

### खून

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 06 कि. मी अंतरावर मौजा मुसळगाव येथे दिनांक 06/03/2020 चे दिनांक 06/03/2020 चे 17.00 वा. दरम्यान विद्याधर भिवा रंगारी(मृतक), वय 55 वर्ष, रा. मुसळगाव ता. कुही हा त्याच्या पाणठेल्यावर हजर असतांना आरोपी क्र. 1) पुरूषोत्तम लोभाजी भुजाडे, वय 32 वर्ष, 2) देवेंद्र उर्फ डोमा लोभाजी भुजाडे, वय 29 वर्ष, 3) धर्मेंद्र लोभाजी भुजाडे, वय 25 वर्ष व 4) श्रीधर मनोहर भुजाडे, वय 34 वर्ष, सर्व रा. मुसळगांव तह. कुही. जि. नागपूर यांनी संगनमत करून 'तु माझ्या भाउ सुनेला वैद्यकी (जादूटोणा) केला, ती दुरूस्त करून दे.' असे म्हणून विद्याधर रंगारी याला पाणठेल्यावरून ओढत नेउन त्याला काठीने मारहाण करून जिवानिशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– प्रतिमा विद्याधर रंगारी, वय 50 वर्ष, रा. मुसळगांव तह. कुहि यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 302, 34 भादंवि. सहकलम 3(2)(व्ही),(5), 3(1)(2बी) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. तसेच सहकलम 2(1)(ख), 6 महाराष्ट्र नरबळी आणि इतरअमानुष अनिष्ठ जादुटोना प्रति. कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी पोर्णिमा तावरे या करीत आहे.

# चोरी

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 01 किमी अंतरावर सावनेर बसस्टॉप येथे दिनांक 07/03/2020 चे 11.30 वा. ते 11.40 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शालीकराम पुंडलीक डांगरे, वय 62 वर्ष, रा. सावरगाव यास अज्ञात 2 आरोपीतांनी आवाज दिला की, 'तुम्हाला ऐकाला येत नाही का तुमच्या बॅगमध्ये काय आहे हे पाहू दया' असे म्हणुन बॅग घेवून पाहीले व बॅगमध्ये असलेली सोन्याची 3 तोळयाची पीटीव मण्याची पोत किमंत 70,000/ रु. ची अज्ञात आरोपीतांनी चोरी केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नारायण बोरकर 9823581297 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर